लोकमत दि. ०९/०१/२०२४

# घरफोडी प्रकरण; आरोपींकडून साडेपाच लाख हस्तगत

## स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** शहरातील सूर्योदयनगर भागात घरफोडी करून सोने-चांदीच्या ऐवजासह रोख पळविणाऱ्या दोघा चोरट्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, आरोपींकडून साडेपाच लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात यश आले आहे.

शहरातील सूर्योदयनगर भागात घरफोडीची घटना घडली होती. या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. शहरातील वाढत्या घरफोड्या, चोऱ्यांच्या घटना लक्षात घेता, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी चोरट्यांचा शोध घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उदय खंडेराय यांनी वेगवेगळी पथके स्थापन केली. या प्रकरणात चोरी केलेला आरोपी कॅनॉल रोड भागात थांबल्याची माहिती सहायक पोलिस निरीक्षक माने व त्यांच्या पथकाला मिळाली.

या माहितीवरून शेख अदिल शेख चाँद (२२) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे विचारपूस केली असता, सय्यय जैम सय्यद अहमद अली (रा. लेबर कॉलनी, नांदेड) व शाहरुख खान (रा. आसरानगर) यांनी मिळून चोरी केल्याची त्याने कबुली दिली.

चोरी केलेले १२ ग्रॅम सोने व २८० ग्रॅम चांदी आणि मोबाइल असा ४ लाख ५३ हजार १३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच आरोपी सय्यद जैम सय्यद अहमद अली याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून रोख ३५ हजार रुपये व गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल आणि मोबाइल असा ९६ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला.

दोन्ही आरोपींकडून मिळून ५ लाख ४१ हजार १३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना विमानतळ पोलिसांकडे सुपूर्द केले आहे.



### चोऱ्या वाढल्याने पोलिसांसमोर आव्हान

जिल्ह्यात मागील काही महिन्यामध्ये चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. बंद घरे फोडून चोऱ्या होत आहेत. त्यामुळे पोलिसांसमोर आव्हान निर्माण झाले आहे. सूर्योदयनगर भागातील चोरीची घटना उघडकीस आल्याने इतर घटनाही उघड होण्याची शक्यता आहे.

# खून प्रकरणातील फरार आरोपी अडकला पोलिसांच्या जाळ्यात

लोकमत न्यूज नेटवर्क

**देगलूर :** लातूर जिल्ह्यातील औसा पोलिस ठाणे अंतर्गत मागील तीन महिन्यापूर्वी अनैतिक संबंधातून एकाचा खून करण्यात आल्याची घटना घडली होती. यातील मयताच्या पत्नीसह इतर दोन आरोपींना यापूर्वीच अटक करण्यात आली होती. मात्र यातील चौथा आरोपी हा खून झाल्यापासून फरार होता. हा आरोपी देगलूर शहरात वावरत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी सोमवारी सकाळी या आरोपीस ताब्यात घेतले आहे.

### चौथा आरोपी होता तीन महिन्यापासून फरार

औसा पोलिसांनी मयताची पत्नी तिचा प्रियकर अश्फाक शेख व अन्य एक असे तीन आरोपीस यापूर्वीच अटक केली होती. मात्र यातील चौथा आरोपी सरवर हबीब खान पठाण हा खून झाल्यापासून तीन महिन्यापासून फरार होता. ८ जानेवारी रोजी पोलिस उपनिरीक्षक श्रीकांत मोरे यांना सदर आरोपी हा देगलूर महाविद्यालय परिसरात असल्याची गुप्त माहिती मिळाली होती.

इस्माईल मुबारक मणियार रा. लातूर यांचे व त्यांच्या पत्नीचे यातील आरोपी अश्फाक शेख याच्यासोबत अनैतिक संबंध होते. मात्र अनैतिक संबंधाला मयत इस्माईल मणियार यांचा अडथळा येत असल्यामुळे इस्माईलची पत्नी व तिचा प्रियकर अश्फाक शेख यांनी इस्माईलचा काटा काढण्याचे ठरविले. यासाठी या दोघांनी सरवर हबीबखान पठाण व अन्य एकास इस्माईल मणियारचा खून करण्याची सुपारी दिली होती.